# खुनी जलसा

**गुरुनाथ नाईक**

**रिया पब्लिकेशन्स्, कोल्हापूर**

B267

प्रमुख वितरक

**अजब डिस्ट्रिब्युटर्स**

६७८-ई, निदान हॉस्पिटलसमोर,
शाहूपुरी, २ री गल्ली, कोल्हापूर.
ajabpublications@gmail.com

**खुनी जलसा : गुरुनाथ नाईक**

© **गुरुनाथ नाईक**

**प्रकाशक**
रिया पब्लिकेशन्स्
६७८-ई, निदान हॉस्पिटलसमोर,
शाहूपुरी, २ री गल्ली, कोल्हापूर.
riyapublications@gmail.com

**प्रमुख वितरक**
अजब डिस्ट्रिब्युटर्स
६७८-ई, निदान हॉस्पिटलसमोर,
शाहूपुरी, २ री गल्ली, कोल्हापूर.
ajabpublications@gmail.com

**अक्षरजुळणी**
रावजी देसाई

**मुखपृष्ठ**
चित्रमित्र पब्लिसिटी, कोल्हापूर.

**मुद्रक**
जयंती प्रिंटरी

**आवृत्ती**
२९ ऑगस्ट, २०१३

**किंमत**
रुपये १३०/-

## अनुक्रमणिका

खुनी जलसा / ५
बोलणारे प्रेत / ७३

# खुनी जलसा

# १

सवाई माधोपूरहून ती जलसा टोळी शेवपूरला आली होती. त्या पार्टीत फक्त सात माणसे होती. सोळा घोड्यांचा ताफा त्यांच्याकडे होता. इतर घोड्यांवर त्यांनी फक्त सामान लादले होते.

त्या जलसा टोळीत दोन स्त्रिया होत्या. एक होती पोक्त अशी गंभीर प्रकृतीची. तिचे वय फार तर पंचवीस वर्षाचे असावे. दिसायला ती सुंदर होती. कोणत्याही घोडेस्वाराने दौडत जाताना एक-दोनदा तरी मागे वळून पाहावे, असे तिचे सौंदर्य होते,

तिचे नाव होते मदुरा.

दुसरी होती तिच्यापेक्षा फक्त एक-दोन वर्षांनी लहान. मस्तवाल अशा घोड्यासारखी ती होती. तिचे बोलणे पुरुषी थाटाचे होते; पण आवाज मात्र मंजुळ होता. तिचे शरीर मदमस्त घोडीसारखे होते. सारा थाट जणू पुरुषाचा.

पण नाचरंगात तिच्याइतकी चपळता दुसऱ्या कुणा स्त्रीची नव्हती. जलशाच्या वेळी असा नाचरंग करायची, की बस्स! मी मी म्हणणारे बडे सरदार एकतर गारठून जायचे; नाहीतर तापलेल्या तव्यासारखी त्यांची अवस्था व्हायची.

जलशाचा ताफा शिवपुरीत पोचाण्याआधीच त्याची कीर्ती येऊन पोचली होती. सरदार दरकदार डोळ्यांत प्राण आणून जलसा ताफ्याची वाट पाहत होते.

आणि एकदाचा ताफा आला.

धर्मशाळेत ताफा उतरला. थोडासा स्थिरस्थावर होतो न होतो तोच एकेक घोडेस्वार त्या ठिकाणी हजेरी लावून जाऊ लागला. हां हां म्हणता

गर्दी वाढू लागली. साऱ्यांनाच गुदमरल्यासारखे झाले; पण आलेल्यांना हाकलून लावणे त्यांना जमले नाही.

कारण, जे कुतुहलाने आले, तेच त्यांचे पोट भरणार होते. तेच तर त्यांचे आश्रयदाते होते.

त्यांना इतर माणसांचे आणि घोड्यांचे अजिबात आकर्षण नव्हते. प्रत्येकाचे डोळे आसुसले होते, ते फक्त बरोबर आलेल्या दोन बाया पाहण्यासाठी. एकेकीचे वर्णन शिवपुरीत असे काही केले होते की बस्स! जणू काही एकेक बाई म्हणजे मेनकेवर ताण!

काही विश्वामित्री थाटाची माणसे होती. ती दूर होती. जवळ येण्याचे त्यांना धैर्य नव्हते. डोळे धर्मशाळेच्या दारावर लागले होते, तर त्यांची तोंडे होती दुसऱ्याच बाजूला. सरळ मान दाराकडे करून पाहण्याचे धैर्य त्यांच्यात नव्हते.

सरदार भगतसिंहाने सर्वात शेवटी आपल्या लवाजम्यासह त्या ताफ्याला भेट दिली. सरदार भगतसिंह ही शिवपुरीतील मातब्बर असामी. धिप्पाड अशा अरबी घोड्यावरून किल्ल्याच्या बुरुजासारखा सरदार फत्तेसिंह धर्मशाळेच्या समोर येऊन ठाकला, तेव्हा एका एका घोडेस्वाराने तिथून पाय काढायला सुरुवात केली.

सरदार भगतसिंहाचा दरारा होताच तसा. अवघ्या शिवपुरीत त्याच्यासमोर मान वर करून पाहण्याचे सामर्थ्य कोणातही नव्हते.

काळ्याकभिन्न देहाचा सरदार फत्तेसिंह घोड्यावरून खाली उतरला. दैत्यासारख्या पांढऱ्या शुभ्र पाठीवर आपल्या देहाला शोभेलशी दणकट थाप देऊन घोड्याचा लगाम त्याने आपल्या नोकराच्या हाती फेकला.

जलसा ताफ्याचे नाव आणि कीर्ती सरदार फत्तेसिंहाने पूर्वीच ऐकली होती. त्या ताफ्यात कामे करणाऱ्या तरुणींची नावे आणि त्यांच्या सौंदर्याचे वर्णनदेखील त्याने पूर्णपणे ऐकले होते.

कदाचित सरदार मानसिंहाची कीर्ती आणि त्याचा दरारा याची कल्पना ताफ्यातील मंडळींना पुरेपूर असावी. घोड्यावरून खाली उतरून दोन पावले त्याने धर्मशाळेच्या रोखाने टाकली आणि भले मोठे मुंडासे बांधलेला एक वृद्ध मानाचा मुजरा करीत घाईघाईत बाहेर आला. त्याच्या मागून आणखी दोघे अदबीने बाहेर आले.



सरदार फत्तेसिंहाची राजासारखी सत्ता या शिवपुरीवर आहे, हेच त्याच्या वागणुकीतून सिद्ध होत होते.

'यावे महाराज.' दोन्ही हात पसरीत त्या वृद्धाने विनंती केली. सरदार फत्तेसिंहाला त्या आदर सत्काराचे काहीही वाटले नाही. असे आदरातिथ्य होईल, हे त्याने पूर्वीच गृहीत धरले होते. त्या वृद्धाच्या मागून तो धर्मशाळेच्या दारातून आत शिरला.

आत एक गादी पसरलेली होती आणि त्या गादीवर दोन लोड ठेवण्यात आले होते. वृद्धाने गादीवर बसण्याची विनंती करताच सरदार फत्तेसिंह लोडाला टेकून बसला. त्यावेळी त्याची नजर सर्वत्र भिरभिरत होती. म्हाताऱ्याच्या चणाक्ष नजरेने त्याच्या नजरेला काय हवे ते हेरले होते. आपले सुरकुत्या पडलेले थोबाड पाहण्यासाठी हा सरदार आलेला नाही, याची त्याला जाणीव होती.

कुणीच काही बोलत नव्हते. उभाउभ्या म्हातारा चुळबूळ करीत होता. काय घडते आहे, याची कुणालाच कल्पना नव्हती. म्हाताऱ्याच्या मते एव्हाना चित्रांगना त्या भूमीत अवतरायला हवी होती. आसुसलेल्या डोळ्यांनी पाहणाऱ्या सरदाराला तिने खूश करायला हवे होते; पण अद्याप ती आली नव्हती. तिच्या घुंगरांचे मंजूळ आवाज अद्याप बाहेर उमटले नव्हते.

'तुझं नाव काय?' पहाडी आवाजात सरदार फत्तेसिंहाने विचारले आणि म्हाताऱ्याने झटक्यात मान खाली झुकवली.

'बहादूर.' म्हाताऱ्याच्या तोंडून थरथरते शब्द बाहेर पडले. सरदार फत्तेसिंहाने 'बहोत खुब' या आवेशाने मान डोलावली; पण नजर मात्र पलीकडच्या दारावर.

घुंगरांचा मंजूळ आवाज त्या शांततेत घुमला. जवळ येणारा तो आवाज ऐकून सरदार फत्तेसिंहाच्या मनात गुदगुल्या सुरू झाल्या. बाहेर येणारी ती स्त्री दारातच थबकल्यासारखी झाली. तिचा एक हात आणि एक पाय सरदार फत्तेसिंहाला दिसत होता. त्याची अधाशासारखी नजर दाराकडे लागली होती. दारावर टांगली होती.

'बाहेर ये.' म्हाताऱ्या बहादूरने शक्य तितक्या सौम्य आवाजात तिला विनंती केली. पुन्हा घुंगरांचा आवाज त्याच्या कानांत शिरला. शांतपणे

चरणाऱ्या हरिणीसारखे एक एक पाऊल टाकत ती सरदार फत्तेसिंहासमोर येऊन उभी ठाकली.

त्यावेळी डोक्यावरचा पदर तिने तोंडावर ओढला होता. अत्यंत तलम अशा पदरातून तिचा चेहरा अस्पष्टसा का होईना, दिसत होता. तिचे गोरेपान शरीर सरदार फत्तेसिंहाला मोहित करेल, याची प्रत्येकाला कल्पना होती. सरदार आता पूर्णपणे पागल झाला आहे, असे प्रत्येकाला वाटत होते.

पण म्हातारा बहादूरचा चेहरा मात्र गोंधळल्यासारखा झाला होता. बाहेर येणाऱ्या त्या स्त्रीकडे पाहून तो प्रथमदर्शनी कावराबावरा झाला होता.

त्याच्या चेहऱ्याकडे मात्र कोणाचेही लक्ष नव्हते.

अधाशीपणे पाहाणारी सरदाराची नजर हळूहळू बदलली. हळूहळू त्याच्या खडबडीत चेहऱ्यावर क्रोधाच्या रेषा उमटू लागल्या. डोळ्यांत हळूहळू क्रोध साठू लागला.

कारण, त्याला हवे ते सौंदर्य हे नव्हते. केवळ यासाठी तो आला नव्हता.

'बहादूर, ही कोण?' क्रोधाने सरदार फत्तेसिंहाने विचारले आणि बहादूरचा धीर खचल्यासारखा झाला. घाबरून त्याने आतील दाराकडे पाहिले; पण दारात कुणीही नव्हते.

यावेळी त्याला मदुरा बाहेर आलेली नको होती. नाठाळ घोडीप्रमाणे चित्रांगना हट्टाने आत राहिलेली आहे, याची कल्पना त्याला आली. सप्पकन तलवार पोटात खुपसली जावी, तसा म्हातारा झटक्यात आत शिरला. ओशाळलेली मदुरा झटक्यात एक गिरकी घेऊन म्हाताऱ्यापाठोपाठ आत शिरली.

सरदार फत्तेसिंह उकळलेल्या कढईसारखा जागच्या जागी खिळून राहिला. त्याची जळजळीत नजर दाराकडे रोखली गेली. डावा हात तलवारीच्या मुठीवर फिरू लागला.

आतून हलक्या आवाजात होणारे बोलणे हळूहळू ऐकू येऊ लागले. सरदार फत्तेसिंहाने कान टवकारले; पण शब्दांचा अर्थ तो लावू शकला नाही. बोलण्याचा आवाज त्याच्या कानांत शिरत होता; पण उच्चारले जाणारे शब्द; त्याला ओळखता येत नव्हते.



बऱ्याच वेळाने म्हातारा बहादूर मान खाली घालून बाहेर आला. तो असह्य बनलेला आहे, हे त्याच्याकडे पाहता क्षणीच सरदार फत्तेसिंहाने ओळखले.

चित्रांगनेच्या स्वभावातील नाठाळपणा सरदार फत्तेसिंहाने ऐकला होता. सुंदर स्त्रीचा नाठाळपणादेखील सौंदर्यासारखा असतो, गळ्यातील हिऱ्याच्या कंठ्यासारखा असतो अशी तो पूर्वी मनाची समजूत घालीत होता; पण आता त्याची समजूत डोक्यातून पार उडाली होती. काय घडले हे बहादूरने न सांगताच त्याच्या डोक्यात शिरले होते. ताडकन तो उठून उभा राहिला. त्यावेळी त्याचे अवाढव्य शरीर थरथरत होते. डाव्या हाताचा पंजा तलवारीच्या मुठीवर आवळला गेला होता. आधीच लालभडक असलेल्या डोळ्यांतून अंगार फुलला होता.

आणि काळाभिन्न राक्षासारखा दिसणारा तो सरदार एक एक पाऊल दाराच्या रोखाने टाकत होता.

त्या ताफ्यातील सर्वच्या सर्व माणसे हादरली होती. चिडलेला सरदार फत्तेसिंह काहीही करायला मागे पुढे पाहणार नाही, याची खात्री त्यांना होती. आपल्या तोंडचा घास या सरदाराने हिरावून नेऊ नये, असेच म्हाताऱ्या बहादूरला वाटत होते. कोणत्या शब्दांत सरदार फत्तेसिंहाची समजूत घालावी, याचा विचार त्याच्या डोक्यात घोळत होता.

'सरदार.' कसेबसे म्हाताऱ्या बहादूरच्या तोंडून शब्द बाहेर पडले. सरदार फत्तेसिंहाचे दाराजवळ पडणारे पाऊल थबकले. बाणाच्या तीक्ष्ण अग्रासारखे हृदयाला भिडणारे डोळे बहादूरच्या क्षीण नजरेला भिडले होते.

'हं...' झुंज खेळताना मस्तवान बैलाच्या तोंडून फेसाबरोबर आवाज बाहेर यावा, तसा सरदार फत्तेसिंहाच्या तोंडून हुंकार बाहेर पडला. म्हाताऱ्या बहादूरचे काळीज चरकल्यासारखे झाले. कारण सरदार फत्तेसिंह काहीही ऐकून घेण्याच्या मनःस्थितीत नाही, हे स्पष्टपणे दिसून येत होते. कंठातून बाहेर येणारे शब्द ओठात अडखळल्यासारखे झाले.

'हं.... सांग.' सरदार फत्तेसिंहाच्या शब्दांचा गडगडाट झाला आणि त्याच्या ताठरलेल्या डोळ्यांकडे पाहून बहादूरच्या काळजाचे पाणी पाणी झाले.

'महाराज, आपण एकवेळ दया दाखवा... मी तिची समजूत घालतो.' कसेबसे शब्द बहादूरच्या तोंडून बाहेर पडले. बहादूरचा क्रोध पाहून त्या शब्दांनादेखील कापरे भरले होते.

बहादूरकडे लक्ष न देताच सरदार फत्तेसिंह चक्रीवादळासारखा दारातून आत घुसला. ताफ्यातील पाचच्या पाच माणसांनी एकमेकांच्या तोंडाकडे पाहिले. बहादूरचा चेहरा क्रोधिष्ट झाल्याची जाणीव चौघांना झाली.

त्यातील एका जवानाने दाराबाहेर डोकावून पाहिले. आता तिथे शिवपुरीतील कुणीही नव्हते. सरदार फत्तेसिंह येताच सर्वांनी हौस मारून तिथून पोबारा केला होता. त्यावेळी बाहेर सरदार फत्तेसिंहाबरोबरआलेले केवळ दोन घोडेस्वार होते. दोघेही दाराकडे पाहत बाहेर उभे होते. सरदार फत्तेसिंहाचा घोडा त्यांनी धर्मशाळेच्या समोर बांधला होता, तर स्वतःचे दोन्ही घोडे त्यांनी दहा-बारा पावलांवर आडव्या कुंपणाला बांधले होते.

'बहादूर दोघेच आहेत.' बायकी चेहऱ्याच्या आणि बायकी हावभाव करणाऱ्या त्या जवानाने त्या म्हाताऱ्याला सांगितले.

'जंगम, सावा तू पाहा... बाहेर कुणाला दिसता कामा नये. मी त्याला पाहून घेईन.' म्हातारा बहादूर क्रोधाने थरथरत्या; पण हलक्या आवाजात बोलला.

त्यावेळी सूर्य मावळला होता. पूर्वी न जाणवणारा मशालीचा उजेड आता जाणवत होता. बाहेर पिठासारखे चांदणे पडले होते. उन्मत्त सरदाराला धडा शिकवण्याचा पुरेपूर निश्चय म्हाताऱ्या बहादूरने केला होता.

जंगमने बाहेर जाऊन हलक्या आवाजात दोघांनाही आत बोलावले आपल्याला सरदारानेच आत बोलावले आहे, याची जाणीव होताच दोघेही सुखावले. दोघेही घाईघाईत दारातून आत शिरले. त्यांनी सभोवार पाहिले. गादीवर सरदार नाही, हे पाहताच तो आत गेला असेल, हे त्यांच्या चाणाक्ष नजरेने ओळखले.

पण विचार करायलादेखील त्यांना संधी मिळाली नाही. तोंडातून शब्ददेखील बाहेर काढता आला नाही. एकाचे शीर पार धडावेगळे झाले होते. त्याच्या म्यानातील तलवार खेचून जंगमने मानेवर घाव घातला होता आणि जंगमच्या सहकाऱ्याने त्याचक्षणी केलेला वार दुसऱ्या रक्षकाची अर्धी मान कापून गेला होता.

बहादूर शांतपणे दारातून आत गेला. आता जे काय घडणार आहे, त्याची चिंता त्याच्या चेहऱ्यावर नव्हती. काय घडणार हे त्याने आधीच



ताडले होते. आतून ऐकू येणारा सरदार फत्तेसिंहाचा आवाज बंद होताच संपूर्ण चित्र त्याच्या डोळ्यांपुढे न पाहताच उभे राहिले.

तो पलीकडच्या दालनात आला आणि रक्ताच्या थारोळ्यात लडबडणारे सरदार फत्तेसिंहाचे शरीर त्यांना पाहावयास मिळाले.

'चित्रा, तू फार घाई केलीस!' तडफडणाऱ्या अवाढव्य देहाकडे नजर रोखत बहादूर बोलला. चित्रांगना मंदपणे हसली. तिच्या हातातील हातभर लांबीचा दोन्ही बाजूला, धार असलेला रुंद पात्याचा सुरा पूर्णपणे रक्ताने माखला होता.

पण तिच्या चेहऱ्यावर कोणतेही भाव नव्हते.

'बहादूर, या सैतानाजवळ मी आयुष्यात कधी गेले नसते. आज रात्रीच आपल्याला इथून पळून जायला हवं... पण बहादूर खंडणी वसूल करायला हवी.' चित्रांगना भडक; पण कठोर आवाजात बोलली. आणि बहादूरने मान होकारार्थी हलवली.

कदाचित त्यालाही ते पटले असावे.

✦✦✦